ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख २४ मार्च, १९५४ | अंक ११

## विविध माहिती

**तीन संशोधन केंद्रांचें उद्घाटन**—एप्रिलच्या ११ तारखेला भारताचे मुख्य प्रधान श्री. नेहरू तीन संशोधन-शाळांचें उद्घाटन करणार आहेत. त्यापैकीं दोन अहमदाबाद येथें आहेत—एक कापडविषयक आणि दुसरी पदार्थविज्ञानविषयक. त्याच दिवशीं भावनगर येथें मीठ-संशोधन-केंद्रहि उघडण्यांत यावयाचें आहे.

**भारतांत क्विनिनचा पहिला कारखाना**—प. बंगालमध्यें कृत्रिम क्विनिन निर्माण करण्याचा एक आधुनिक कारखाना काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. कारखान्याचें चालकत्व इंपिरिअल केमिकल इंडस्ट्रीजकडे देण्यांत येणार असून त्यांत दरवर्षी १·५ कोटी पौंड क्विनिन तयार होईल. भारताला अंदाजें इतकें क्विनिन लागतें. कारखान्याची यंत्रसामुग्री परदेशाहून आयात केली जाईल.

**जनरल थिमय्या अमेरिकेला जाणार**—कोरिआंतील भारतीय सेनेचे सेनापति ले. ज. थिमय्या अमेरिकेला जाणार आहेत, असें समजतें. युनायटेड स्टेटस् रेडिओ अँड टेलिव्हिजन कॉर्पोरेशनकडून त्यांना बोलावणें आलें आहे. कोरिआंत तटस्थ-राष्ट्र-कमिशनवर काम करीत असतांना आपल्याला आलेले अनुभव ते टेलिव्हिजनवरून अमेरिकन जनतेला सांगणार आहेत.

**पालम येथील विमानतळ**—दिल्ली येथील पालम विमानतळाचा विस्तार व विकास करण्याची योजना आंखली गेली आहे असें समजतें. विमानें उतरण्याचा पट्टा अधिक लांब करणें आणि प्रकाशाची व्यवस्था अधिक चांगली करणें, हीं दोन कामें मुख्यतः करण्यांत येणार आहेत. पहिल्या कामासाठी २० लाख रुपये आणि दुसऱ्या कामासाठी १० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**विकासकार्यासाठी मदत**—राजस्थान सरकारनें राज्यांतील स्थानिक स्वरूपाच्या विकासकार्यासाठीं १०·७० लाख रुपये मंजूर केले आहेत. राज्यांतील २३ जिल्ह्यांत ह्या रकमेंतून कामें चालू करण्यांत येणार आहेत. मध्यवर्ती अगर राज्य सरकारनें ज्या भागांत कामें सुरू केलेली नाहींत अशा भागांतूनच हीं नवीं कामें सुरू करण्यांत यावयाचीं आहेत.

**ब्रिटिश प्रदर्शनांत भारतीय माल**—मे ३ ते मे १४, ह्या कालावधींत ब्रिटनमध्यें एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत भाग घेण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ब्रिटिश राष्ट्रकुलांतील राष्ट्रांचा आपापसांत व्यापार वाढविण्याच्या दृष्टीनें ह्या प्रदर्शनाचा फार उपयोग होईल, असें म्हणतात.

**मध्यप्रदेशांत औद्योगिक शाळा**—मध्य प्रदेश सरकारनें आपल्या राज्यांतील औद्योगिक शाळांची पुनर्घटना करण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें अकोला, नागपूर, जबलपूर, रायपूर आणि अमरावती ह्या शहरांतील हस्तव्यवसायांच्या शाळांचें रूपांतर तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शाळांत करण्यांत येणार आहे.

**ओरिसा राज्याची आर्थिक पाहणी**—पुणें येथील गोखले अर्थ आणि राज्यशास्त्र संस्था ओरिसा राज्याची आर्थिक अवस्था व हिराकूद धरणामुळें होणारा आर्थिक फायदा ह्या दोन बाबींची पाहणी करणार आहे. ह्या कामासाठीं कटक आणि संबळपूर ह्या दोन ठिकाणीं स्वतंत्र कचेऱ्या उघडण्यांत येणार आहेत.

**ब्रिटनच्या स्वस्त मोटारगाड्या**—जिनीव्हा येथें लवकरच मोटारगाड्यांचें एक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्याच सुमारास जर्मन कारखानदारांनीं आपल्या छोट्या गाड्यांच्या किंमती उतरविण्याचें जाहीर केलें आहे. जर्मन कारखानदारांची ही स्पर्धा लक्षांत घेऊन ब्रिटिश कारखानदारहि आपल्या मोटारींच्या किंमती उतरविण्यासाठी काय करावें ह्यासंबंधीं विचार करूं लागले आहेत.

**प्रवाशांच्या वहातुकीपासून मिळकत**—भारतीय रेल्वेजना ५० वर्षांपूर्वी प्रवाशांच्या वहातुकीपासून जितकी मिळकत होत असे, तिच्या ११ पट मिळकत हल्लीं होते. १९५२-५३ सालीं रेल्वेच्या प्रवासी-वहातुकीच्या प्रत्येक १०० रुपये मिळकतीपैकीं ८८ रुपये मिळकत तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांपासून झाली.

**वृत्तपत्राच्या कागदाचा पुरवठा**—गेल्या दहा वर्षांच्या कालांत वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाची मागणी आणि पुरवठा ह्यांचा प्रथमच मेळ बसला. हा मेळ ह्यापुढें असाच राहील, असें दिसतें. गेल्या वर्षी जगांत १,०८,००,००० टन कागदाचें उत्पादन झालें. त्यापैकीं ५७,२५,००० टन कागद कॅनडांत निर्माण झालेला होता.

**रशिआची तेलाची निर्यात**—तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारांत रशिआ आपलें बस्तान बसविण्याचा प्रयत्न करीत आहे, असें दिसतें. सध्यां इस्राइल, अर्जेंटायना, प. जर्मनी, इटली, बेल्जम, फ्रान्स व इतर पश्चिम युरोपीय राष्ट्रें ह्यांना तेल पुरविण्याची इच्छा रशिआनें प्रदर्शित केली आहे.

**ओरिसामधील मँगनीझचे कारखाने**—ओरिसा राज्यांत मँगनीझ खनिजाचे चार कारखाने काढण्यांत येणार आहेत. पैकीं तीन उत्तर ओरिसांत आणि एक दक्षिण ओरिसांत निघेल. उत्तरेंतील कारखान्यांना हिराकूड धरणाची वीज मिळेल आणि दक्षिणेंतील कारखान्यांना मुचकुंद धरणाची वीज मिळेल.

### भारताचा मध्यपूर्वेशीं व्यापार

मध्य-पूर्वेतील देशांशीं होऊं शकणाऱ्या व्यापाराविषयीं माहिती करून घेण्यासाठीं भारतीय सरकार एक व्यापारी-प्रतिनिधी मंडळ पाठविणार आहे, असें समजतें. १९४८ सालीं अशाच प्रकारचें मंडळ पाठविण्यांत आलें होतें. त्या मंडळानें इराक, इराण, सिरीया, लेबॅनॉन, तुर्कस्थान, ईजिप्त, सुदान आणि सौदी अरबस्थान ह्या देशांना भेटी दिल्या होत्या. मंडळानें आपल्या दौऱ्याचा जो अहवाल तयार केला होता, त्यांत असें म्हटलें होतें कीं बहुतेक सर्वच देशांत भारताशीं आपला व्यापार वाढावा अशी भावना दिसून आली. भारताच्या मालाला मध्यपूर्वेतील देशांत गिऱ्हाइकं मिळवून देणें अशा स्वरूपाचा हा प्रश्न नव्हता. खरी अडचण वेगळीच दिसून आली. मध्यपूर्वेतील देशांना ताग, कापड, सूत, लोखंडाचे पत्रे, सिमेंट इत्यादि मालाची जरूरी आहे. ह्या मागण्या पुरवतांना भारताला काय अडचणी येतात हेंच तद्देशीय व्यापाऱ्यांना समजून घ्यावें लागेल. त्यांना ह्या अडचणींची कांहींच कल्पना नव्हती. चहा आणि साखर ह्यासारखे अनेक अन्नपदार्थ भारताकडून आयात करतां आल्यास ते बऱ्याच देशांना पाहिजे आहेत. तथापि हा अहवाल हातीं आल्यापासून मध्यपूर्वेतील परिस्थितींत बराच फरक पडला आहे. भारताचा ह्या देशांशीं चालणारा व्यापार बराच घटला आहे. सिरीआ, सौदी अरबस्थान आणि इतर कांहीं देशांना भारतानें १९५२ सालीं जितका माल निर्यात केला होता, त्यापेक्षा थोडासा अधिकच माल अलीकडे निर्यात केला आहे हें खरें; पण इतर देशांना भारताकडून होणाऱ्या निर्यातींत मात्र सर्वसामान्यपणें घटच झालेली आहे.

---

**नवीन भांडवलाला परवानगी**— १९५३ सालीं ४·२३ कोटी रुपयांच्या परकीय कंपन्यांच्या भांडवलाला भारतांत परवानगी देण्यांत आली. निरनिराळ्या २१ उद्योगधंद्यांना ही परवानगी देण्यांत आली. परकीय भांडवलावरील रॉयल्टी म्हणून ४३·१७ लाख रुपये परदेशीं पाठविण्यांत आले.

**ओरिसा सरकारला मदत**—ओरिसा राज्यांतील विकास-कार्याला मदत म्हणून भारतीय सरकारकडून ३·७७ रुपयांची मदत आणि ५·९१ लाख रुपयांचें कर्ज अशा रकमा मिळणार आहेत. आतांपर्यंत राज्य सरकारला मदतीदाखल ११·२५ लाख रुपये आणि कर्ज म्हणून ३·३६ लाख रुपये मिळालेले आहेत.

### अविकासित राष्ट्रांच्या विकासाचा प्रश्न

ब्रिटनचे माजी अर्थमंत्री मि. ह्यू गेट्सकेल हे सध्यां मुंबईत आहेत. अप्रगत देशांच्या विकासासंबंधीं इंडिअन कौन्सिल फॉर वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेपुढें भाषण करतांना त्यांनीं पुढीलप्रमाणें विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, सध्यां मनुष्यजातीपुढें सगळ्यांत भीतिदायक आणि मूलगामी असा एकच महत्त्वाचा प्रश्न आहे, आणि तो म्हणजे जगांतील अविकसित देशांचा आर्थिक विकास घडवून आणणें. गेल्या कांहीं वर्षांत जगांत एकंदरीनें उत्पादनांत, विशेषतः औद्योगिक उत्पादनांत, असामान्य प्रगति झालेली आहे. पण त्याचबरोबर असेंहि झालें आहे कीं जगांतील निरनिराळ्या भागांतील देशांच्या लोकांच्या जीवनमानांत असलेला फरकाहि अधिक वाढला आहे. जीं राष्ट्रें पूर्वी सुखवस्तू होतीं तीं अधिकच सधन होत चाललेलीं दिसून येत असून ज्या राष्ट्रांची गणना अप्रगत देशांत केली जात असे त्यामधील लोकांची रहाणी मात्र होती तशीच राहिली आहे. ह्याचें कारण असें आहे कीं, उत्पादन वाढलें तरी तें वाढत्या लोकसंख्येला कसेंबसें पुरेल इतकेंच वाढलें. अर्थात्, रहाणीच्या मानाला जो अडथळा उत्पन्न होईल असें भाकीत माल्थसनें केलें होतें तो उत्पन्न झाल्यासारखा दिसत आहे. अप्रगत देशांना आपली आर्थिक प्रगति करून घेण्यासाठी अखेर स्वतःच्याच सामर्थ्याचा उपयोग करावा लागेल. बाहेरच्या मदतीचा उपयोग कांहीं मर्यादेच्या आंतच होईल. ह्या महत्त्वाच्या बाबतींत ब्रिटन आपल्याकडून होईल ती मदत देण्यास तयार आहे; पण ती मदत अशा वेळीं देण्यांत येईल कीं, तिचा उपयोग भारताला ज्यावेळीं जास्तींत जास्त होईल.

---

**अमेरिकन विद्यापीठाची मदत**—खरगपूर येथील इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलाजी ह्या संस्थेशीं अमेरिकेंतील इलिनॉइस विद्यापीठानें करार केला आहे. इलिनॉइस विद्यापीठ परस्पर-सहकार्याचा एक कार्यक्रम आखून तो अमलांत आणणार आहे.खरगपूर येथील संस्था सरकारी असून तींत सध्यां ९०० विद्यार्थी शिकत आहेत. संस्थेची वाढ झाल्यावर २,००० विद्यार्थी शिकूं शकतील.

**सरकारच्या शिलकी मालाची विक्री**—भारतीय सरकारच्या सप्लाईज अँड डिस्पोझल्स खात्यानें मार्च १, १९५१ ते सप्टेंबर ३०, १९५३ पर्यंत आपल्याजवळील अनावश्यक शिलकी मालाची विक्री करून ५०,९६,१२६ रुपये मिळविले.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.


एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :


ब्रँच सेक्रेटरी.



किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे





वसंत नं. ३ चरक

" शरद चरक "

उसाचे चरक

हंगाम नजीक आला !

—सविस्तर माहितीसाठीं आजच लिहा.—

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)

# अर्थ

बुधवार, ता. २४ मार्च, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## योजनेप्रमाणें उत्पादन होण्यास मागणीची आवश्यकता

### मूळ अंदाज चुकले ?

पंचवार्षिक योजनेंत वगवेगळ्या उद्योगधंद्यांचीं उत्पादन-लक्ष्यें ठरविण्यांत आलीं आहेत, परंतु तीं ठरवितांना अपेक्षित मागणीचा पुरेसा विचार झाला नाहीं, असें आतां दिसून येऊं लागलें आहे. योजना तयार करण्यांत आली, त्यावेळीं उत्पादनवाढीच्या मार्गांत ज्या अडचणी आढळल्या, त्या दूर करण्याकडे प्रथम लक्ष देण्यांत आलें. चालू उत्पादनक्षमतेचा पूर्ण उपयोग व्हावा, हें सहाजिकच ठरलें. उत्पादनक्षमतेची वाढ हा मुख्य उद्देश नव्हता. उत्पादनाच्या अडचणी जसजशा कमी होऊं लागल्या, तसतसें उत्पादन वाढूं लागलें, परंतु मागणी मात्र उतरूं लागली. कित्येक कारखान्यांपुढें उत्पादित मालाच्या विक्रीचा प्रश्न उभा राहिला. पंचवार्षिक योजनेची जसजशी प्रगति होत जाईल, तसतशी जनतेची क्रयशक्ति सुधारेल, ही अपेक्षा प्रत्यक्षांत उतरलेली आढळत नाहीं. मशीनटूल्सच्या कारखान्यांना अनुभव चांगला आला नाहीं. ह्या उलट, सिमेंटचें उत्पादन व खप ह्यांचे आंकडे मात्र अपेक्षेबाहेर वाढत जात आहेत. कपास, कापड आणि साखर ह्यांच्या उत्पादनांतील वाढ अपेक्षेस धरून आहे. कागदाच्या बाबतींत अपेक्षेबाहेर प्रगति होत आहे. लोखंड आणि पोलाद ह्यांचीहि मागणीच्या अपुरेपणाबद्दल तक्रार नाहीं. ह्या उलट, मोटारी, डिझेल इंजिनें, विजेचे पंखे, ह्यांचें उत्पादन अपेक्षेप्रमाणें सुधारण्याची शक्यता आज तरी दिसत नाहीं. मोटारींच्या उत्पादनासाठीं आवश्यक ती यंत्रसामुग्री कारखान्यांनीं उभारली असून, हिंदुस्थान आणि प्रीमिअर ऑटोमोबाइल्स ह्यांचे कारखाने ६०,००० गाड्या बनवूं शकतील; पण मागणी कोठें आहे ? १२,००० गाड्यांची मागणी कृत्रिम रीतीनें वाढविली तरी उत्पादनक्षमता पूर्णपणें वापरली जाणें संभवनीय नाहीं. शेती व उद्योगधंदे ह्यांतील नव्या गुंतवणुकीच्या अभावामुळें डिझेल इंजिनें आणि स्पिनिंग फ्रेम्स ह्यांचा उठाव मूळ अपेक्षेप्रमाणें होत नाहीं. विजेच्या पंख्यांची गोष्ट मात्र जरा वेगळी आहे. त्यांची किंमत उतरवितां आली, तर आज पंख्यांना चैनीची वस्तु समजणारे लोक उद्या त्यांनाच गरजेच्या वस्तू मानूं लागतील. सोडा ॲश आणि कॉस्टिक सोडा ह्यांच्या मागणीचा अंदाज तर फारच चुकला आहे. अल्युमिनिअमचीहि तशीच गोष्ट आहे.

---

### डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांचें भाषण

टॅक्सेशन इन्क्वायरी कमिशनचे सभासद डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांचें भारताच्या येत्या वर्षाच्या अंदाजपत्रकाविषयीं दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संस्थेपुढें एक व्याख्यान झालें. डॉ. राव ह्यांनीं आपल्या भाषणांत असा इषारा दिला कीं रोजच्या वस्तूंचा पुरवठा शक्य त्या सर्व मार्गांनीं वाढविण्याचा प्रयत्न सरकारनें केला नाहीं तर चलन-वाढीचा धोका बऱ्याच मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीं. आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत करव्यवस्थेचें कार्य काय असावें ह्याविषयींहि त्यांनीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं तुटीच्या अंदाजपत्रकामुळें ज्यांना अधिक किफायत अगर प्राप्ति होईल त्यांच्याकडून तो पैसा काढून घेण्यासाठीं काय करावें ह्यासंबंधीं करचौकशी मंडळाकडे सरकारनें विचारणा करावी. ही जादा प्राप्ती केव्हां होते याचा सरकारनें काळजीपूर्वक अभ्यास करावा. अर्थव्यवस्थेच्या कोठल्या भागांत आणि कोणत्या वर्गाला अशी प्राप्ति होत आहे त्याचाहि अभ्यास करण्यांत यावा आणि मग अशा प्राप्तीचा जास्तींत जास्त भाग आर्थिक विकासासाठीं काढून घेण्यासाठीं उपाययोजना करावी. जे सधन असतील त्यांनीं आपली रहाणी नजरेंत भरण्याइतकी उच्च ठेवूं नये. कारण, त्यामुळें भांडवली मालाच्या उत्पादनाला आणि ग्राहकांना लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाला लागणारा पैसा भलतीकडेच खर्च होईल.

### औद्योगिक उत्पादनाची दिशा व लक्ष्यें

| | १९४८ | १९५२ | १९५३ (अंदाज) | १९५५ (अंदाज) | १९५५ (योजना) |
|---|---|---|---|---|---|
| कपास कापड ( कोटी वार ) | ४३२ | ४६० | ४९५ | ५०० | ४७० |
| सिमेंट (१००० टन ) | १५३३ | ३५२८ | ३९२१ | ५२०० | ४८०० |
| कागद व बोर्ड ( टन ) | ९७,९०८ | १,३७,५०८ | १,४०,००० | २,००,००० | १,८८,००० |
| साखर (१००० टन ) | १,००० | १,४९४ | १,२९० | १,६०० | १,५५० |
| डिझेल इंजिनें ( संख्या ) | १,०२० | ४,२४८ | २,६०० | १०,००० | ५०,००० |
| इलेक्ट्रिक पॉवर ( १००० संख्या ) | १८० | १९६ | २१६ | २५० | ३६० |
| कॉस्टिक सोडा ( टन ) | ४,३८० | १७,०६७ | १९,६१० | २५,००० | ३३,००० |
| सोडा ॲश ( टन ) | २९,१४८ | ४४,३२८ | ५५,६७० | ७०,००० | ७८,००० |
| इलेक्ट्रिक मोटर्स (१००० अ. श.) | ६० | १५७ | १७१ | २०० | ३२० |
| मोटारी ( संख्या ) | — | ४,०७७ | — | १५,००० | ३०,००० |
| ॲल्युमिनिअम ( टन ) | ३,३६१ | ३,५६६ | ३,३७५ | ४,००० | १२,००० |

# बँकांच्या ठेवी व कर्जें : व्याजाचे दर

## १०७ बिगरशेड्यूल्ड बँकांच्या ठेवी
( आकडे लक्ष रुपयांचे )

| व्याजाचा दर | रक्कम | एकूणशीं प्रमाण % |
|---|---|---|
| १. ... ... ... | ३,१२ | ८·८३ |
| २. ०% पेक्षां ज्यास्त ते ¼% | ५९ | १·६७ |
| ३. ¼% ,, ½% | २,९३ | ८·२९ |
| ४. ½% ,, १% | ७८ | २·२१ |
| ५. १% ,, १½% | २,६८ | ७·५८ |
| ६. १½% ,, २% | ४,९४ | १३·९७ |
| ७. २% ,, २½% | ३,८३ | १० ८३ |
| ८. २½% ,, ३% | ५,५४ | १५·६७ |
| ९ ३% वर ... | १०,९४ | ३०·९५ |
| १० एकूण ... ... | ३५,३५ | १००·०० |

## १०७ बिगर-शेड्यूल्ड बँकांची कर्जें
( आकडे लक्ष रुपयांचे )

| व्याजाचा दर | रक्कम | एकूणशीं प्रमाण % |
|---|---|---|
| १. १% व त्याखालीं | ३९ | १·८६ |
| २. १% पेक्षां ज्यास्त ते २% | ३५ | १·६७ |
| ३. २% ,, ३% | १,७६ | ८·४० |
| ४. ३% ,, ४% | ९३ | ४·४४ |
| ५. ४% ,, ५% | २,२४ | १०·७० |
| ६. ५% ,, ६% | ४,६७ | २२·३० |
| ७. ६% ,, ७% | १,१५ | ५·४९ |
| ८. ७% ,, ८% | १,७५ | ८·३६ |
| ९ ८% ,, ९% | ४,४६ | २१·३० |
| १०. ९% वर ... ... | ३,२४ | १५·४७ |
| एकूण ... ... | २०,९४ | १००·०० |

## शेड्यूल्ड व बिगर-शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींवरील व्याजाची वर्गवारी
( आकडे लक्ष रुपयांचे )

| व्याजाचा दर | शेड्यूल्ड बँका (८७) | | बिगर-शेड्यूल्ड बँका (१०७) | | एकूण बँका (१९४) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | एकूणशीं प्रमाण% | रक्कम | एकूणशीं प्रमाण% | रक्कम | एकूणशीं प्रमाण% |
| १. ०% ... ... ... ... | २२०,४३ | २६·८० | ३,१२ | ८·८३ | २२३,५५ | २६·०६ |
| २. ०% ते ¼% ... | १४३,२५ | १७·४१ | ५९ | १·६७ | १४३,८४ | १६·७७ |
| ३. ¼% पेक्षां ज्यास्त ते १% ... | ९२,८७ | ११·२९ | ३,७२ | १०·५० | ९६,५८ | ११·२६ |
| ४. १% पेक्षां ज्यास्त ते २% ... | १२३,८१ | १५·०५ | ७,६२ | २१·५६ | १३१,४३ | १५·३२ |
| ५. २% पेक्षां ज्यास्त ते ३% ... | १९२,४४ | २३·३९ | ९,३७ | २६·५१ | २०१,८१ | २३·५२ |
| ६. ३% चे वर ... ... ... | ४९,८० | ६·०५ | १०,९४ | ३०·९५ | ६०,७४ | ७·०८ |
| एकूण ... ... ... | ८२२,५९ | १००·०० | ३५,३५ | १००·०० | ८५७,९४ | १००·०० |

## शेड्यूल्ड व बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांवरील व्याजाची वर्गवारी
( आकडे लक्ष रुपयांचे )

| व्याजाचा दर | शेड्यूल्ड बँका (८७) | | बिगर-शेड्यूल्ड बँका (१०७) | | एकूण (१९४) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | एकूणशीं प्रमाण% | रक्कम | एकूणशीं प्रमाण% | रक्कम | एकूणशीं प्रमाण% |
| १. १% व त्याखालीं ... ... | ४,४६ | १·०४ | ३९ | १·८६ | ४,८५ | १·०७ |
| २. १% पेक्षां ज्यास्त ते ३% ... | १८,९६ | ४·४० | २,११ | १०·०८ | २१,०७ | ४·६७ |
| ३. ३% पेक्षां ज्यास्त ते ६% ... | ३६०,५८ | ८३·७४ | ७,८४ | ३७·४४ | ३६८,४२ | ८१·५९ |
| ४. ६% चे वर ... ... | ४६,६१ | १०·८२ | १०,६० | ५०·६२ | ५७,२१ | १२·६७ |
| एकूण ... ... | ४३०,६१ | १००·०० | २०,९४ | १००·०० | ४५१,५५ | १००·०० |

## कंपन्यांच्या ताळेबंदाचा बोध

( ले.—श्री. श्री. वा. काळे )

हल्लीं बहुतेक सुशिक्षितांचा एखाद्या तरी लिमिटेड कंपनीशीं भागीदार, ठेवीदार, विमेदार इत्यादि प्रकारांनीं संबंध येतो. परंतु कंपनीची खरी परिस्थिति त्यांना समजणें कठीण जातें. कंपनीचा ताळेबंद प्रसिद्ध होतो, त्यावरून योग्य तो बोध होत नाहीं. याचें कारण, कायद्यानें आवश्यक तेवढाच तपशील त्यांत दिलेला असतो व सामान्य मनुष्यास त्यापासून हवी ती माहिती मिळवितां येणें अवघड जातें. म्हणून ताळेबंदांतील आंकड्यांचा अर्थ कसा लावावयाचा हें समजून घेतलें पाहिजे.

### भागीदार जागरूक हवेत

कंपनीचें एकूण येणें व एकूण देणें वर्षांतील एका ठराविक दिवशीं किती आहे, हें ताळेबंद दर्शवितो, हा ताळेबंद संचालकांनीं तयार केलेला असतो व भागदारांनीं, ऑडिटरांनीं तो तपासलेला असतो. अगदीं बारीक टाइपांत असलेला हा अहवाल कित्येक वेळां कांहीं बाबी सूचित करतो, परंतु त्या अहवालाकडे वाचकाचें लक्ष जात नाहीं. ताळेबंदांत दाखविलेलें देणें हें खरें असतें, म्हणजे तें द्यावेंच लागतें; परंतु येणें हें पूर्णपणें वसूल होईलच, असें सांगतां येणार नाहीं. म्हणून येणें बाजूची म्हणजेच जिंदगीची जरा कसून चौकशी केली पाहिजे. इमारती व यंत्रसामुग्री या हळूहळू झिजत जातात किंवा नाश पावतात. त्यांची भविष्यकाळासाठी तरतूद केलेली आहे किंवा नाहीं, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असते. जिंदगींत दाखल असलेल्या कांहीं बाबींना खोटीच किंमत लावलेली नाहींना, हेंहि पाहावें लागतें. बँका, विमा-कंपन्या इत्यादींचे ताळेबंद ठराविक पद्धतीनेंच करावे लागतात व त्यांच्यावर रिझर्व्ह बँकेची व विमा-अधिकाऱ्यांची देखरेख असते. परंतु औद्योगिक कंपन्यांची गोष्ट वेगळी आहे. कंपनीकायद्यांत आतां सुधारणा करण्यांत येत असून कंपन्यांच्या चालकांवरील निर्बंध वाढविण्यांत येणार आहेत. तथापि, कायद्याच्या बंधनापेक्षा भागीदारांचा जागरूकपणाच अधिक प्रभावी ठरेल व तो उद्योगधंद्याच्या विकासास पोषकच ठरेल.

### कमी माहिती देण्याची प्रथा

कंपन्या आपल्या ताळेबंदांत व अहवालांत शक्य तेवढी माहिती लपवितात, ही गोष्ट सर्वच ठिकाणच्या कंपन्यांना लागू आहे. ग्रेटब्रिटनमध्यें "अकौंटंट" या साप्ताहिकानें बक्षिसाची एक योजना नुकतीच जाहीर केली आहे. ज्या कंपनीच्या ताळेबंदांत व अहवालांत सर्वांत जास्त तपशील दिलेला आढळेल, तिला बक्षीस देण्याचें या साप्ताहिकानें ठरविलें आहे. कंपनी कशाचें उत्पादन करतें तें सुद्धां तिच्या अहवालावरून कित्येक वेळां कळत नाहीं!

ताळेबंदांतील व अहवालांतील महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या हें न कळल्याकारणानें पुष्कळ वेळां अगदीं क्षुल्लक गोष्टींवर भर दिला जातो व वार्षिक सभेचा वेळ त्या गोष्टींच्या चर्चेंतच निघून जातो. कोट्यवधि रुपयांचा व्यवहार करणारी कंपनी असली तरी तिचे भागीदार ताळेबंदाचा कागद, त्याची छपाई, पट्टेवाल्यांच्या कपड्यांस आलेला खर्च, अशा गोष्टींवरच चर्चा करतात आणि चालकांनाहि अशी चर्चा सोयीचीच वाटते.

ताळेबंदावर संचालकांच्या, मॅनेजिंग एजंटांच्या व ऑडिटरांच्या सह्या असतात. सामान्य लोक ऑडिटरच्या सहीला अवास्तव महत्त्व देतात त्याचप्रमाणें संचालकहि ऑडिटरनें सही केली म्हणजे, 'सर्व कांहीं ठीक आहे' असें समजतात.

### मॅनेजिंग एजंटाच्या सहीचें महत्त्व

वास्तविक या सर्व सह्यांत मॅनेजिंग एजंटाची सही हीच महत्त्वाची सही समजली पाहिजे. कारण, त्यानें तयार केलेल्या याद्या व लावलेली किंमत यांवरच बाकीच्यांना साहजिकच विसंबावें लागतें. मुंबईला कंपनीची मुख्य कचेरी असून तिची गिरणी गुजराथमध्यें किंवा कर्नाटकमध्यें असेल तर मुंबईच्या ऑडिटरनें ती गिरणी समक्ष कधींहि पाहिलेली नसणें अगदीं शक्य असतें. मुख्य कचेरीनें ठेवलेलीं हिशेबाचीं पुस्तकें तपासणें एवढेंच त्याचें काम असतें. मालाच्या याद्या व त्याची किंमत यांच्या तक्त्यांखालीं मॅनेजिंग एजंट दाखला देतात व "सर्टिफाइड बाय मॅनेजिंग एजंट्स्" असें म्हटल्यानें बाकीच्यांवर अधिक तपशिलांत जाण्याची जबाबदारीहि उरत नाहीं. म्हणूनच कंपनीच्या व्यवहाराचा दर्जा हा अखेर मॅनेजिंग एजंटांच्या कर्तृत्वाप्रमाणेंच त्यांच्या नीतिमत्तेवरहि अवलंबून असतो. चांगला मॅनेजिंग एजंट कंपनीचा नफा हिशोबांत लपवून ठेवतो. संचालकांनाहि त्याची कल्पना येऊं देत नाहीं. रोजच्या संसारांत व्यवहारी मनुष्य आपले पैसे वेगवेगळ्या ठिकाणीं पेरून ठेवतो; त्याची पत्नीहि मुलाच्या मुंजीच्या वेळीं साठवलेले पैसे बँडसाठी पुढें करते. तशाच प्रकारची दक्षता सुज्ञ मॅनेजिंग एजंट घेतो. कंपनीची दीर्घकालीन भरभराट व्हावी, अशी इच्छा असणारांच्या व त्याप्रमाणें वागणारांच्या हातीं सूत्रें असलीं तर कंपनी तात्कालिक अडचणींतून सहज बाहेर पडूं शकते हा अनुभव अनेक वेळां आलेला आहे.

केसरी, ५-३-५४

---

### परदेशी चित्रपटांचें भाडें

परदेशांतून भारतांत दाखविण्यासाठी जे चित्रपट आणण्यांत आले, त्यांच्या भाड्याच्या पोटीं ३८·७० लक्ष रुपये १९५३ मध्यें परदेशीं पाठविण्यांत आले. ह्याच्या उलट, हिंदी चित्रपटांनीं परदेशांतून ८·२७ लक्ष रुपये भाडें आणलें.

---

### 'KANA ANI KSHANA'

By *S. V. Kale.* ( Published by author, Poona ).

The ordinary man of today has an acute desire to improve himself. He is eager to learn more about the art of living. He avidly swallows good wholesome advice and the more commonplace it is, the more he appears to like it. The printed word still impresses him. Books that give practical advice on 'how to promote domestic harmony' or 'how to be popular among friends' have therefore a ready sale. No wonder their output is large.

*Kana ani Kshana* is such a book. It is a collection of articles on topics that range from 'Use of Leisure' to 'Problem of Entertaining Guests.' It is full of good wholesome advice. The only trouble is that it is very common place. It could have occured to any one. But this is no disqualifiction from the point of view of readers for whom it is meant.

—"*The Times of India*"
7-3-1954.

## दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि., कोल्हापूर

१९५३ चें वर्ष, सदर अहवालाचें वर्ष, सर्व व्यापाराला व मुख्यतः बँकिंग धंद्याला अतिशय प्रतिकूल असें गेलें. कोल्हापूर येथील एकदोन मोठ्या स्थानिक बँकांनीं गेल्या दीड वर्षांत आपले व्यवहार बंद केले. त्यामुळें निर्माण झालेल्या नाजुक परिस्थितींत युनियन बँकेच्या ठेवीदारांचे संपूर्ण सुरक्षिततेसाठीं व बँकेचें स्थैर्य कायम राखणेसाठी बरीचशी मोठी रक्कम, नेहमीं हातांत रोख ठेवून, व्यवहार करणें भाग पडलें. अशा प्रतिकूल परिस्थितींतहि बँकेस झालेला नफा असमाधानकारक वाटणार नाहीं असा विश्वास आम्हांस आहे. या सर्व प्रतिकूल परिस्थितींत बँकेच्या ठेवीदारांनीं, भागीदारांनीं व हितचिंतकांनीं बँकेवरील आपला विश्वास कायम ठेवून फार मोठें सहकार्य दिलें, व बँकेची प्रगति कायम टिकविण्यांत हातभार लावला. सदर सालीं बँकेस निव्वळ नफा रु. २१,५३१-०-८ झाला आहे व यांत मागील सालची नफ्यांतील बाकी राहिलेली रक्कम रु. ४९-११-२ धरून, निव्वळ नफा रु. २१,५८०-११-१० झाला आहे. सदर पैकी खालीं लिहिल्याप्रमाणें नफ्याची विभागणी करण्यांत आली:—

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंड ... .... | रु. ५,०००—०—० |
| बॅड डेट व रिझर्व्ह फॉर कॉन्टिन्जन्सी फंड .... | रु. १,०००—०—० |
| इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड .... | रु. २,०००—०—० |
| शेअर्सवर रु. ३ टक्के प्रमाणें डिव्हिडंड (करमाफ) .... | रु. ५,२११—१—० |
| इन्कमटॅक्सकरितां तरतूद .... | रु. ८,३००—०—० |
| पुढील सालचे हिशेबांत जमा होणेसाठी .... | रु. ६९-१०-१० |
| एकूण रुपये... | २१,५८०-११-१० |

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,७६,३७५ | रोख, बँकांत, कॉल डिपॉझिटस | ६,७७,५०९ |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,२२,००० | इन्व्हेस्टमेंटस | ५,८९,६४० |
| ठेवी | २०,८७,५६३ | कर्जें | १०,१०,५२५ |
| नफा | २१,५८० | | |

### श्री. पोतदार यांचा पूना बँकिंग असोसिएशनतर्फे सत्कार

मराठा चेंबरचे कार्याध्यक्ष, श्री. दा. वा. पोतदार, ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई लोकल बोर्डाचे सभासद म्हणून नेमणूक झाली, त्याबद्दल त्यांचा सन्मान करण्याकरितां पूना बँकिंग असोसिएशननें शुक्रवार दि. १९ रोजीं रात्रीं थाटाचा भोजन-समारंभ घडवून आणला. त्यावेळीं सुमारें ३० बँकर्स उपस्थित होते. भोजनोत्तर, गोलमेज बैठकींत, श्री. पोतदार ह्यांच्या अभिनंदनपर श्री. गाडेकर, श्री. पुरोहित व श्री. चितळे ह्यांचीं समयोचित भाषणें झालीं, व त्यांना पुष्पगुच्छ अर्पण करण्यांत आला. श्री. पोतदार ह्यांच्या आभारप्रदर्शनाच्या सौजन्यपूर्ण भाषणानंतर पानसुपारी वगैरे झाल्यावर त्यांनीं प्रत्येकाचा वैयक्तिक निरोप घेतला.

## दि बँक ऑफ कराड लि., कराड

वरील बँकेस अहवालाचे वर्षी २४,१२७ रु. नफा झाला. त्यांत मागील शिल्लक नफा मिळविल्यावर नफा वाटणीस २५,१३८ रु. आला. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करण्याचें ठरलें.

| | रु. |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | ५,००० |
| इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड | १,००० |
| जनरल रिझर्व्ह फंड | १,००० |
| डिव्हिडंड (४% कर माफ) | ८,७१० |
| इन्कमटॅक्स तरतूद | ८,६०० |
| शिल्लक नफा, पुढें ओढला | ८२८ |
| | २५,१३८ |

बँकेच्या सातारा शाखेचें काम समाधानकारक चालू आहे.

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,१८,३०० | रोख बँकांत | २,५०,१३९ |
| रिझर्व्ह, इतर फंड | ४६,००० | इन्व्हेस्टमेंटस | ९,३५,२७१ |
| ठेवी | २०,२७,२४२ | कर्जें | ११,५५,३९८ |
| नफा | २४,१२७ | | |

## रद्द विम्यांचें चिंताजनक वाढतें प्रमाण

### जाळ्यांपेक्षा पिंजऱ्यांची आवश्यकता अधिक !

हिंदी आयुर्विम्यामध्यें रद्द होणाऱ्या विम्यांचें प्रमाण फार मोठें आहे, ह्या घटनेकडे इन्शुअरन्स कंट्रोलरनें आपल्या ताज्या रिपोर्टांत पुनः एकवार लक्ष वेधलें आहे. गेल्या कांहीं वर्षांत लॅप्स होणाऱ्या विम्यांची संख्या बरीच वाढली आहे. ह्याचा अर्थ, युद्ध काळांत व युद्धोत्तर काळांत जो व्यवहार करण्यांत आला, तो अतिशय कमी दर्जाचा होता हें उघड आहे. १९५२ मध्यें हिंदी विमा कंपन्यांनीं ५,१२,००० नव्या पॉलिसी दिल्या, पण चालू पॉलिसींच्या संख्येंत मात्र फक्त १,१४,००० पॉलिसींची भर पडली! १९५१ मध्येंहि ४,५२,००० नव्या पॉलिसी दिल्या गेल्या तरी चालू पॉलिसींच्या संख्या फक्त १,३०,००० पॉलिसींनी वाढली होती! १९५२ मध्यें रद्द पॉलिसींचें वाढलेलें प्रमाण चिंताजनक आहे. पॉलिसी रद्द होण्यामुळें एजंटाच्या व कंपनीच्या प्रयत्नांस निष्फळता प्राप्त होते आणि विमेदाराची बचत कारणीं लागत नाहीं. विमेदारांच्या आवाक्याबाहेरच्या रकमांचे विमे त्यांचेवर लादले जातात, त्यास आळा बसला पाहिजे. व्हिक्टोरिया राणीच्या काळांतील अविवाहित तरुणींचें लक्ष जाळीं विणण्याकडेच असे; पिंजरे करण्याकडे नसे; असें सांगतात. भारतांतील विमा एजंटांनाहि आज तें वर्णन लागू पडतें!

### मध्यवर्ती अमेरिकन सरकारचा शास्त्रीय संशोधनावर खर्च

फेडरल अमेरिकन सरकारनें १९५१-५२ मध्यें ९०० कोटी रुपये शास्त्रीय संशोधनावर खर्च केले. १९५२-५३ मधील तत्सम खर्चाचा आंकडा ११०० कोटी रुपये भरला. एकूण खर्चाच्या ९०% खर्च, म्हणजे प्रत्येक १० रुपयांपैकी ९ रुपये लष्करी दृष्ट्या उपयुक्त अशा संशोधनावर खर्च झाले. शुद्ध संशोधनावर फारच थोडा खर्च झाला.

### गूळ तयार करण्याची योग्य पद्धत

गुळाचा दर्जा सुधारण्यासाठीं विशिष्ट रसायनांचा उपयोग करावा आणि कोणत्याहि रंगाचा गूळ तयार करण्याच्या दृष्टीनें कृत्रिम रंग वापरावा अशीं आशयाचीं हस्तपत्रकें रासायनिक पदार्थांचे कांहीं व्यापारी वाटीत असल्याचें सरकारच्या निदर्शनास आलें असून पाडेगांव येथील सरकारी ऊंस संशोधन केंद्रानें या पद्धतीबाबत शिफारस केली आहे असेंहि त्या हस्तपत्रिकेंत म्हटलें आहे. या पद्धतीचा अवलंब केल्यामुळें गुळाचा दर्जा बिघडल्याच्या तक्रारीहि उसाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून सरकारकडे आल्या आहेत. तेव्हां शेतकऱ्यांनीं फक्त पाडेगांव येथील ऊंस संशोधन केंद्रानें शिफारस केलेल्या पद्धतीचाच अवलंब करावा व उपरोक्त हस्तपत्रिकेंत सांगितलेल्या पद्धतीचा वगैरे उपयोग करूं नये, असा त्यांस सल्ला देण्यांत येत आहे. सदरहू केंद्रानें शिफारस केलेली गूळ तयार करण्याची योग्य पद्धत पुढीलप्रमाणें आहेः—

प्रत्येक १६०० रत्तल अथवा ४० घासलेटचे डबे इतक्या उसाच्या रसाला ६ औंस या प्रमाणांत डबल सुपर फॉस्फेट वापरावें. डबल सुपर फॉस्फेट न मिळाल्यास सिंगल सुपर फॉस्फेट १० औंस या प्रमाणांत वापरावे. सुपर फॉस्फेट त्याच्या वजनाच्या सुमारें पांचपट इतक्या पाण्यांत मिसळावें. हें मिश्रण सुमारें अर्धा तास उकळावें आणि नंतर साध्या लिननच्या कापडांतून गाळावें. अशा रीतीनें तयार होणारें हें मिश्रण ढोरमळी काढून टाकल्यानंतर काहिलींत घालावें. ही पहिली मळी काढून टाकण्यासाठीं भेंडीच्या रसाचा चांगला उपयोग होतो. सुपर फॉस्फेटचें मिश्रण काहिलींत टाकल्यानंतर मळीचे थर धरतात व ते काळजीपूर्वक काढून टाकावें लागतात; नाहींतर गुळाच्या दर्जावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते. वर सांगितल्यापेक्षा अधिक प्रमाणांत सुपरफॉस्फेट घातलें तर गूळ मऊ होतो. तेव्हां वर सांगितलेल्या प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणांत तें घालूं नये.

खाऱ्या जमिनींतील उसापासून तयार होणाऱ्या गुळास थोडासा खारटपणा येतो म्हणून अशा उसाच्या बाबतींत दुसरी सोनमळी काढून घेतल्यानंतर १,६०० रत्तल रसास कागदी लिंबाचा ८ ते १० तोळे रस घालावा.

वरील पद्धतीनें तयार केलेला गूळ रंग, दर्जा, चव, वगैरे दृष्टीनें उत्कृष्ट असतो व त्याला भावहि चांगला येतो.

---

### विम्याचे हप्ते उतरणार

लोकांची आयुर्मर्यादा वाढली असून गुंतवणुकीवरील व्याजाचा दरहि सुधारला आहे. ह्याचा फायदा घेऊन कांहीं मोठ्या कंपन्यांनीं हप्ते उतरविण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. अर्थात, नव्या विम्यासच हे नवे दर लागू होतील, हें उघड आहे. युद्धानंतर, बहुतेक कंपन्यांनीं आपले हप्त्यांचे दर वाढविले होते. कारण त्यावेळीं व्याजाचे दर उतरत गेले होते आणि व्यवस्था खर्च वाढत चालला होता. आतां, खर्चांत ज्यास्त वाढ होण्याचा रंग दिसत नाहीं; व्याजाचे दर मात्र आणखी वाढून गुंतवणुकीचें उत्पन्न सुधारण्याचा बराच संभव आहे. ज्या कंपन्यांचें चालू काम पुष्कळच मोठें आहे, त्यांना हप्त्यांचे दर कमी करून इतर कंपन्यांशीं स्पर्धा करण्याचें चांगलें साधन प्राप्त होणार आहे. एस्टेट ड्यूटीमुळेंहि आयुर्विम्याचा प्रसार होण्यास मदत होईल; तिचाहि फायदा मोठ्या कंपन्यांनाच मुख्यत्वें होईल हें उघड आहे.


## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | १-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, टिळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५२ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

अधिकृत भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ५,००,०००
वसूल भांडवल रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् रु. ७१,६००

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी अ. मॅनेजर. एन. व्ही. पांडव मॅनेजर

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१, ३१६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ तारेचा पत्ता : फार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल
भागीदारांतर्फे रु. ३३,९९,१५०
मुंबई सरकारतर्फे रु. १६,००,०००
रु. ४९,९९,१५०
गंगाजळी व फंड रु. ५४,३३,९००
ठेवी रु. ९,२५,२६,५००
खेळतें भांडवल रु. १२,२९,०२,८००

१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें; पेंड.
★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.
★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.
★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.
★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.
★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.